भारतातील शिक्षणाची सद्यस्थिती व शिक्षण तज्ञाच्या शिफारशी

(Current Status of Education in India and Recommendations of Educationists)

प्रा. डॉ. संजय तळतकर
अर्थशास्त्र विभाग,
महिला कला महाविद्यालय,
गेवराई, जि. बीड
E-mail: sanjaytalatkar@rediffmail.com

प्रस्तावना :

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ज्या देशातील मानव संसाधन सशक्त, बुद्धीमान, नवीन आव्हानाना समोरे जाणारे व संशोधक असेल, तो देश उद्या जगावर वर्चस्व करेल, यामध्ये शंका नाही. कालपर्यंत अतिरिक्त लोकसंख्या विकासाला अडसर समजली जात होती. विकासासाठी युक्ततम लोकसंख्या आवश्यक आहे हे मत आग्रही पणे मांडले जात होते. आज जास्तीची लोकसंख्या विकासासाठी आवश्यक मानली जात आहे.

विकासाचे इंजिन म्हणजे खुलेपणा हे पटवण्यात विकसीत देश यशस्वी झाली. देशातील अतिरिक्त उत्पादन विकसनशील देशात विकता यावे व वृद्धीदर टिकवता यावा, हा उद्देश या खुलेपणा मध्ये होता. विकशनशील देशाच्या गळी उतरविण्यासाठी जागतिकीकरणाचा अर्थ म्हणजे दारिद्र्य निर्मुलन, बेकारी निर्मुलन आणि विकासाचा मोठा वेग असा लावला, तो पटवून दिला. विकसनशील देशातील अर्थव्यवस्था जागतिकीकरण्यासाठी खुली होऊ लागली. या देशातील तरुण प्रक्रियेत सहभागी होऊ लागला. त्याचा परिणाम असा झाला की, विकसीत देशातील रोजगार विकसनशील देशातील तरूणांकडे संक्रमीत झाला. स्वस्त आणि कुशल तरूण बहुराष्ट्रीय कंपन्यांना मिळाला. परिणाम म्हणुन विकसीत राष्ट्रातील युवकच रस्त्यावर आला. अमेरिका सारख्या आर्थिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या देशाला बेकारीचा प्रश्न सतावू लागला.

बेकारी निर्मुलनावरील उपाय म्हणजे शिक्षण होय. याची जाणीव अमेरिकन अध्यक्ष बराक ओबामांना झाली. त्यांनी त्यांच्या देशातील तरूणांना आवाहन केले. 'शिक्षण हेच विकासाचे मूळ आहे'. भारतीय तरूण शिक्षणातून व्यवसायाचा संधी स्वतःकडे खेचत आहे. हे थांबवण्यासाठी तुम्हाला पुन्हा एकदा शिक्षणाकडेच जावं लागेल व अमेरिकेचे पूर्वीचे वैभव मिळवावं लागेल. भांडवलाच्या मदतीने विकसनशील देशावर अधिराज्य प्रस्थापित करता येईल. या धारणेतून जागतिकीकरण गरीब देशांच्या गळी उतरविले. परिणाम मात्र उलटा झाला. विकसनशील देशाने आपल्या अतिरिक्त मनुष्य बळाचा युक्ततम वापर करून देशाला आर्थिक महासत्तेच्या पंगतीत नेऊन बसवले आहे. आज चीन ही जगातील दुसरी महासत्ता बनली असुन, भारत चौथ्या क्रमांकावर आहे. जगातील आर्थिक सत्तेची सुत्रे चीनकडे की भारताकडे हाच मुद्दा आता खऱ्या अर्थाने चर्चिला जात आहे. 2025 मध्ये भारत जगातील सर्वात श्रीमंत राष्ट्र असेल, असे भाकीत अनेक अर्थतज्ञ करीत आहेत, त्याचे कारण म्हणजे लोकसंख्या आणि शिक्षण.

भारत 2025 मध्ये लोकसंख्येत सर्व प्रथम असेल. कारण चीनने प्रभावी लोकसंख्या नियंत्रण धोरण राबवून लोकसंख्या वाढीचा वेग नियत्रंणात आणला आहे. भारताला अजून हे शक्य झाले नाही. त्यामुळे 2025 मधला भारत जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असणारा देश असणार आहे. अतिरिक्त लोकसंख्या विकासाला घातक समजली जात होती. पण तिचा जर योग्य वापर केला तर विकास होऊ शकतो याची अनुभूती चीन भारत आणि ब्राझील च्या रूपाने जगास प्रत्ययास आली आहे. त्यामूळे ज्या देशाकडे अधिक लोकसंख्या तो देश उद्याच्या सर्वात श्रीमंत देश अशी एक धारणा अर्थशास्त्रात विकसीत होत असताना दिसत आहे.

परंतू प्रश्न निर्माण होतो, अतिरिक्त लोकसंख्या नेमकी कशी असावी ?

देशातील तरुण शिक्षीत, कुशल, श्रमकरण्याची प्रवृत्ती असणारे, संशोधक आणि मूल्यधिष्टीत असेल तर लोकसंख्या भांडवलात रूपांतरीत होऊ शकते. त्यातून देशाची अर्थव्यवस्था प्रभावी होऊन, देश महासत्तेकडे जाऊ शकतो. अन्यथा हीच लोकसंख्या देशाला केंव्हा गिळंकृत करेल हे सांगात येणार नाही. लोकसंख्याचे रूपातंर भाडवलात करून देशाला आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी गरज आहे. शिक्षण

गुणवत्तेचे असावे त्याच बरोबर जगात निर्माण होणाऱ्या गरजेनुरूप लवचिकता असावी. जेणेकरून तरूणांना रोजगार मिळेल व व्यवसाय संधी अशाच देशात केंद्रीत होतील. त्याच बरोबर उद्योग आणि भांडवल मोठ्या प्रमाणात निर्माण होईल.

शिक्षण :

"जाणून" घेणे हा माणसाचा नैसर्गिक स्वभाव आहे. त्या अनुषंगाने मनुष्य सतत धडपड करीत असतो. या धडपडीला एका व्यवस्थेत बांधण्याचे काम शिक्षणाने केले आहे. शिक्षणातून निसर्गातील शक्तींना समजून घेण्याचे व त्यावर मात करण्याचे तंत्र विकसीत करण्याचा प्रयत्न केला जातो. एकोणिसाव्या शतकात शिक्षणाचा अभाव असल्यामूळे अज्ञानी लोकांची वेगवेगळ्या कारणातून पिळवणूक केली जात होती. हे शोषण धर्माच्या नावावर, जातीच्या नावावर, अज्ञानाच्या नावर सतत चालूच होते. हे जर थांबवयाचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्यायच नाही, ही धारणा समाज सुधारकांमध्ये निर्माण झाली. त्याने त्यासाठी जीवनभर कष्ट घेतले. महात्मा फुले तर म्हणत,

विद्येविना मति गेली,
मतीविना निती गेली,
नीतीविना गति गेली,
गतिविना वित्त गेले,
वित्ताविना शुद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले.

या वरून हेच लक्षात येते की, शिक्षण हेच विकासाचे इंजिन आहे. शिक्षण फक्त आर्थिक विकासच साध्य करत नाही, तर 'तुम्ही कुठे आहात' याची जाणीव करून देते. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत, शिका, संघटीत व्हा, आणि संघर्ष करा. विकासाबरोबर 'स्वसन्मान' शिक्षणातून दिला जातो. शिक्षणातून शोषणाची जाणीव होते. त्याच बरोबर शिक्षण व्यक्तीला प्रगतीस कारणीभूत ठरते.

नेल्सन मंडेलानी शिक्षणाचा संबंध दारिद्र्याशी जोडला. दारिद्र्य माणसाच्या प्रगतीच्या वाटा रोखते. या कैदेतून जगातील प्रत्येकाची मुक्तता व्हायलाच हवी. तुम्ही, आम्ही सारे त्यासाठी एकत्र यायला हवे. जग सुंदर बनवण्यासाठी जात-पात धर्म, देश, रंग, वंश यांच्या सीमारेषा पुसणारे शिक्षण हीच खरी काळाची गरज आहे.

केरळमधील शिक्षणतज्ज्ञ डॉ. के.बी. जिनन यांनी शिकवणे हेच निसर्गाचा अभ्यास करण्यासाठी अडथळा निर्माण करते असे मत मांडले. म्हणून त्यांना वाटते की, साचेबद्ध आणि कप्पेबद्ध शिक्षण पद्धतीतून बाहेर पडण्याची वेळ येऊन ठेपली आहे. त्यासाठी मुलांची प्रतिभा, चौकस बुद्धी, कृतिशीलता, यांना चालना देणारे शिक्षण आता शाळामधून मिळायला हवे.

एन. आर. नारायणमुर्ती यांचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन भांडवली आहे. त्यांच्या मते, मागील दोन दशकता जगाचा चेहरा मोहरा बदलला आहे. बौद्धिक संपदा ही 21 व्या शतकाची खरी संपत्ती ठरली आहे. त्यासाठी भारताचा उच्च शिक्षणात बदल करून झेप घ्यावी लागणार आहे.

'द वर्ल्ड इज फ्लॅट' या पुस्तकाचे लेखक व न्युयार्क टाइम्स वृतपत्राचे स्तंभ लेखक फरेडमन यांनी अमेरिकेच्या समृद्धीचे गुपीत सांगितले. अमेरिकेचे यशव पाच मुलमंत्रावर आधारलेले आहे. ते पाच मुलमंत्र म्हणजे शिक्षण, पायाभूत सोयी सुविधा, विस्थापन, भांडवलनिर्मिती व सरकारी निधीतून प्रोत्साहित केलेले संशोधन. शिक्षणाविषयी विचारांचा मागोवा घेतल्यानंतर हे लक्षात येते की, विकासाचा मूलमंत्र जागतिकीकरण नसून शिक्षण हाच आहे. त्यामूळे एकविसाव्या शतकात भारताला महासत्ता व्हायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही.

शिक्षणातून विद्यार्थ्यांना विज्ञान, तंत्रज्ञान, श्रम मूल्य शिकवून सुजाण, सक्षम व विज्ञान भिमूख विद्यार्थी तयार करणे गरजेचे आहे. हे सर्व भारतीय शिक्षण पद्धतीतून देता येऊ शकले का ? हा प्रश्न खऱ्या अर्थाने आज निर्माण झाला आहे.

भारताच्या शिक्षणाची सद्यःस्थिती :

भारताने शिक्षणाचा हक्क मान्य करून, कायदा केला. सर्वांना मोफत शिक्षणाची जिम्मेदारी सरकारने स्वतःवर घेतली. कायदा केल्यानंतर प्रत्येक भारतीय विद्यार्थी शिक्षण घेतो की ? या संदर्भात केलेला अभ्यास अतिशय बोलका आहे.

2011 मध्ये भारतात 27 लाख विद्यार्थी शाळाबाह्य दाखवण्यात आली आहेत. ही संख्या 2009 साली 81 लाख दाखवण्यात आली होती. प्रत्यक्षात ही संख्या अधिक असावी असा अंदाज व्यक्त करण्यात येतो. आजमितीस 4 कोटीपेक्षा अधिक मुले शाळाबाह्य असावेत.

ओ.एल.ओ. च्या मते भारतामध्ये 2 कोटीपेक्षा जास्त बालकामगार आहेत. तर युनिसेफच्या अभ्यासात ही संख्या एक कोटीपेक्षा जास्त दर्शविली आहे.

देशात प्रत्येक वर्षी आठ कोटी मजूर हंगामी स्थलांतर करतात. त्यांच्या बरोबर 60 लाखापेकी अधिक मुले स्थंलातरीत होतात. तर वेश्या व्यवसायात 20 लाख व बाल व्यवसाय 5 ते 15 वयोगटातील मुले आहेत. ही ठोकळ आकडे तीन कोटीच्या वरती जातात. यावरून एक अंदाज येतो की, आज जवळपास 4 कोटीपेक्षा अधिक मुले ही शाळाबाह्य आहेत. शाळाबाह्य मुलांचा तर गंभीर प्रश्न आहे. पण त्याच बरोबर विद्याच्यांच्या उपस्थितीची एक मोठी समस्या शिक्षणासमोर उभी ठाकली आहे.

विद्यार्थ्यांची उपस्थिती :

उपस्थिती बाबतचा विचार केल्यास एचआरडी मंत्रालयाने केलेल्या सर्व्हेमध्ये खालील स्थिती दिसून आली.

राज्य	प्राथमिक शाळेतील उपस्थिती	माध्यमिक शाळेतील उपस्थिती
आंध्रप्रदेश	72.7	76.6
बिहार	42.2	36.8
हिमाचल प्रदेश	94.6	93.2
केरळ	91.4	92
तामिळनाडू	88.3	87.8
ओरिसा	66.8	69

याच पाहणीमध्ये शिक्षकांच्या उपस्थिती बद्दल ही अभ्यास करण्यात आला. ही उपस्थिती खालील प्रमाणे दर्शविण्यात आली.

राज्य	प्राथमिक शिक्षण	माध्यमिक शिक्षक
बिहार	75.8	74.9
गुजरात	70	87.6
हरियाना	86.9	91.9
हिमाचल प्रदेश	80	88
केरळ	84.5	58.3
महाराष्ट्र	87.6	87.1
तामिळनाडू	86.6	89.6
प.बंगाल	96.3	98.1

एच.आर.डी. मंत्रालयाच्या पाहणीतून ही वास्तवता लक्षात आली. आणखीन खोलवर जाऊन अभ्यास केला व त्यामध्ये किती शिक्षक शाळेवर तासिका ज्येतात तर ते प्रमाण 60 ते 70 टक्क्याच्या जवळपास येते. यापुढे जाऊन शिक्षकांच्या गुणवत्तेबद्दल अभ्यास केला तर ते प्रमाण 40 ते 50 टक्क्याच्या जवळपास येईल. विद्यार्थी व शिक्षक यांचे प्रमाण घेतले तर प्रत्यक्षात 20% ते 30% शिक्षकाचे शाळेवर असलेली दिसून येतील. शाळेतील अनुपस्थिती बाबत जे वास्तव आहे. त्यापेक्षा अधिक वाईटस्थिती शैक्षणिक गुणवत्तेबाबतची आहे.

गुणवत्ता :

प्राथमिक शाळेतील गुणवत्तेचे चित्रण अतिशय दारूण आहे. 2009 च्या केलेल्या पाहणीमध्ये ही विदारकता लक्षात आली.

या अभ्यासामध्ये पाचवीच्या मुलाकडून दुसरीचे अभ्यास पुस्तिका वाचून घेतली तर देशातील 50.3% मुलांना पुस्तक वाचता आले नाही. दुसऱ्या अभ्यासामध्ये पाचवीच्या मुलाकडून भागाकार सोडवून घेतला जवळपास 36% विद्यार्थ्यांना भागाकाराची क्रिया करता आली नाही. हा अभ्यास प्रथमेश अन्युअल स्टेट्स ऑफ एज्युकेशन रिपोर्ट मध्ये देण्यात आला आहे. यावरून देशातील शिक्षणाच्या गुणवत्तेचे विदारक दृश्ये

दिसते.

अशा अवस्थेत भारतातील उच्च शिक्षणाचा दर्जा काय असू शकतो, याचा अंदाज येतो. जागतिकीकरणामध्ये स्पर्धापुर्ण शिक्षण आवश्यक आहे. हे शिक्षण महाविद्यालयातून आणि विद्यापीठातून दिले जाते. देशातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती फार चांगली नाही. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूलभूत सुविधांचा अभाव मोठ्या प्रमाणात आहे. एनडीटिव्ही चे विनोद दुआ व नीता अंबानी यांनी मिळून शाळेतील सुविधांची पाहणी

केली. तेंव्हा ती वास्तवता दिसल्यानंतर मुले येथे शिकू शकतात ? हा प्रश्न दोघासमोर निर्माण झाला होता. काही शाळेत तर मुलीसाठी स्वच्छतागृहच नाहीत. मुलांचा प्रश्नच निर्माण होत नाही. ही स्थिती मुंबई मधील शाळेची आहे. त्यामूळे ग्रामीण भागातील शाळेबद्दल बोलणेच नको. शाळेची उपस्थिती आणि मूलभूत सुविधा यांचे चित्र अतिशय दारूण आहे. त्यापेक्षा वाईट स्थिती बारावीनंतर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येची आहे.

देशातील विद्यार्थ्यांचे बारावी नंतरचे शिक्षण घेण्याचे प्रमाण अतिशय अल्प आहे. केंद्रीय मनुष्यबळ विभागाने प्रकाशित केलेल्या अहवालामध्ये ते खालील प्रमाणे (टक्केवारीमध्ये) दिसुन आले.

राज्य	मुले	मुली
आंध्रप्रदेश	21.3	12.3
गोवा	26.1	30.9
महाराष्ट्र	25.3	16.9
उत्तराखंड	27.5	45.2
मेघालय	14.8	16.1
मिझोरम	28.3	24.7
दिल्ली	50.7	44.7

संदर्भ :

केंद्रीय मनुष्यबळ विभाग 2011 देशातील बारावी नंतर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जवळपास 25% च्या आसपास असेल यावरून भारतीय विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणाबाबतीत उदासीन दृष्टीकोन दिसून येतो. हा दृष्टिकोन शाखा निवडीवरून अनुभवास येतो. भारतीय तरूण विशेष करून कला या शाखेस प्राधान्य देतात. ही शाखा उत्तीर्ण होण्यास सोयीचे असते, असा त्यांचा दृष्टिकोन असतो. एवढेच नव्हे तर महाविद्यालयात अनुपस्थित राहुन ही उत्तीर्ण होता येते, हा एक सरळउद्देश त्यांचा असतो. म्हणजे शिक्षण घेण्याच्या पाठीमागे फार मोठा उद्देश असलेला दिसुन येत नाही. शाखा निहाय प्रसिद्ध झालेली आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

राज्य	कला (आर्टस)	वाणिज्य	विज्ञान
आंध्रप्रदेश	124009	202671	277578
बिहार	576511	70048	147397
गुजरात	168478	141404	65896
कर्नाटक	349668	190548	90144
महाराष्ट्र	644910	392519	242591
दिल्ली	209971	120114	42152

संदर्भ :-

केंद्रीय मनुष्यबळ विभाग 2011 देशातील बारावी नंतर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जवळपास 25% च्या आसपास असेल यावरून भारतीय विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षणाबाबतीत उदासीन दृष्टीकोन दिसून येतो. हा दृष्टिकोन शाखा निवडीवरून अनुभवास येतो. भारतीय तरूण विशेष करून कला या शाखेस प्राधान्य देतात. ही शाखा उत्तीर्ण होण्यास सोयीचे असते, असा त्यांचा दृष्टिकोन असतो. एवढेच नव्हे तर महाविद्यालयात अनुपस्थित राहुन ही उत्तीर्ण होता येते, हा एक सरळ उद्देश त्यांचा असतो. म्हणजे शिक्षण घेण्याच्या पाठीमागे फार मोठा उद्देश

असलेला दिसुन येत नाही. शाखा निहाय प्रसिद्ध झालेली आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

वर्ष	महाविद्यालये	विद्यापीठ	विद्यार्थी संख्या (दशलक्ष)
1950-71	578	28	0.2
1970-71	1819	45	0.6
1990-91	4577	123	2.8
2001-02	11146	272	8.8
2004-05	17662	342	10.5
2006-07	20677	376	11.8
2009-10	29951	500	16

संदर्भ :- युजीसी अन्युअल रिपोर्ट एप्रिल 30, 2007

आज देशात 16 दशलक्ष एवढे विद्यार्थी उच्चस्तरीय शिक्षण घेत आहेत. विदेशात शिक्षण घेण्याचे प्रमाण 270000 एवढे आहे. एकूण शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याचे हे प्रमाण काढले तर ते 13% एवढेच भरते. अमेरिकेत ते 25% एवढे आहे व जगाची सरासरी 22% एवढी आहे. विकसीत राष्ट्रातील उच्च शिक्षण घेणाऱ्याचे प्रमाण कमी असण्याची कारणे म्हणजे तिथे व्यवसायभिमुख कोर्सेस मोठ्या प्रमाणात चालवले जातात. त्यामूळे तेथील तरूण लगेच व्यवसायासाठी अथवा रोजगारासाठी जोडला जातो. भारतामध्ये असे होत नाही. पदव्युत्तर शिक्षण घेण्याचे प्रमाण 71% च्या वर प्राध्यापक होणे एवढेच मर्यादीत आहे. आज भारत 2020 मधील आर्थिक महासत्ता बनू पाहत आहे. चीनने कमी काळात आर्थिक प्रगती घडवून आणली. यासाठी लोकशक्तीचा पर्याप्त वापर केला. एवढेच नव्हे तर जागतिक विद्यापीठ गुणवत्ता यादीमध्ये आज चीनच्या पाच विद्यापीठाने जागा मिळवली आहे. ही विद्यापीठे जागतिक क्रमवारीमध्ये 47, 54, 105, 154 व 177 व्या क्रमांकावर आहेत. मुंबई येथील आयआयटी महाविद्यालय 2010 मध्ये 187 व्या क्रमांकावर होते. ते आता 225 व्या क्रमांकावर मागे ढकलेले गेले आहे. यावरून भारतीय विद्यापीठातील गुणवत्ता लक्षात येते.

इन्फोसिसचे माजी सीईओ व संस्थापक नारायणमुर्ती यांनी उच्च शिक्षणबद्दल खंत व्यक्त केली. त्यांच्या मते भारतीयाने पश्चिमात्यांचे अनुकरण केले, पण त्यांची संशोधन वृत्ती स्वीकारली नाही. भारतात संशोधकांना सन्मान आणि पैसा दोन्हीही मिळत नाही. त्यामुळे भारतीय तरूण विदेशात जाण्यात पसंत करतो.

1980 पर्यंत भारत संशोधन क्षेत्रात 10 व्या क्रमांकावर होता. तो 90 दशकता 12 व्या क्रमांकावर गेला आहे. भारतात फक्त अवकाश आणि सरंक्षण क्षेत्रातच संशोधन होते. इतर क्षेत्रात ते दिसत नाही. भारतीय उद्योगानी रेडिमेड संशोधनाच्या मदतीने उत्पादन करणेच पसंत केले आहे. म्हणुन भारतीय स्टिव्ह जॉब्ज निर्माण झाला नाही की गुगल सारखी कल्पना पुढे आली नाही. त्यामुळे भारतीय शिक्षण जागतिकीकरणामध्ये लुळे पडत आहे. याचा विचार होणे गरजेचे आहे. असे मत मुर्ती यांनी मांडले. देशातील वाढत्या लोकसंख्येचे रूपांतरण उत्पादक शक्तीमध्ये करणे ही काळाजी गरज आहे. मनुष्य संसाधन मंत्रालयाने यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन करून देश पातळीवर शिक्षणामध्ये समानता प्रस्थापित करण्यासाठी वेगवेगळ्या पातळीवर हालचाली सुरू केल्या आहेत.

महाराष्ट्र देशातील एक औद्योगिक राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यातील शिक्षण प्रणालीमध्ये बदल घडवून आनून ते शिक्षण जागतिकीकरणासाठी अनुरूप करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. याचाच एक भाग म्हणून अणू उर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली. या समितीमध्ये डॉ.रघुनाथ माशलेकर, माजी कुलगुरू राम ताकवाले, राष्ट्रीय ज्ञान आयोगाचे माजी सल्लागार डॉ. अशोक कोळसकर, माजी सचिव कुमूद बन्सल, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. शिवरामन, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू राजन वेळूकर, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष अरुण निगवेकर, आर.के. शेगावकर, विजय भाटकर व नितीन पुजारी ही मान्यवर व त्या त्या क्षेत्रातील अभ्यासक व तज्ज्ञ या समितीचे सभासद आहेत. त्यामुळे समितीने सुचवलेल्या शिफारशी शिक्षणात आमुलाग्र बदल घडवून आणू शकतील असा विश्वास आहे.

या समितीने शासनाला अहवाल सादर केल आहे. अहवालामध्ये सर्व घटकांसाठी अभ्यासपुर्ण शिफारसी केल्या आहेत. अभ्यासक्रमातील घटकाविषयी, विद्यापीठाचा कारभार सुधारण्याविषयी नेतृत्व निर्मितीसाठी व विद्यार्थ्यांसाठी. या सर्व शिफारसीचा उहापोह करणे

शक्य नाही. परंतू त्यातील ठराविक शिफारसीचा विचार केला आहे.

काकोडकर समितीच्या शिफारसी :

1) **विद्यापीठ समाजाभिमूख असावीत** :- या अनुषंगाने समितीने विद्यापीठातील अभ्यासक्रम बदलून समाजाभिमूख करावा अशी शिफारस केली आहे. जिल्हा स्तरावरील ग्रामीण उद्योगधंदे, व्यवसाय, स्थानिक गरजा यांचा विविध विद्याशाखा मध्ये समावेश करावा. यासाठी जिल्हा पातळीवर विद्यापीठाची निर्मिती करण्यात यावी. विद्यापीठाला अभ्यासक्रमाविषयक पूर्णतः स्वायत्ता देण्यात यावी. त्याचबरोबर परीक्षा विभाग स्वायत्त असावा.

2) **आयोगाची स्थापना** :- राज्यातील उच्च शिक्षण विषयक धोरण निश्चित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण आणि विकास आयोगाची (MAHED) स्थापना करण्यात यावी या आयोगामध्ये नामवंत शिक्षण, संशोधक, तंत्रज्ञ, उद्योजक आणि उद्योगाविषयीचे तज्ज्ञ यांचा समावेश करण्यात यावा हा आयोग स्वतंत्र असावा या आयोगास सल्ला देण्याचे काम सल्लागार परिषद व शैक्षणिक आणि विकास परिषद यांनी काम करावे सरकारचे नियंत्रण आयोगावर असू नये. आयोगाने सरकार आणि विद्यापीठामध्ये मध्यस्थाची भूमिका पार पाडावी. सर्व विद्यापीठे आयोगाला जबाबदार राहतील तसेच आयोगाने कुलगुरू व इतर विभाग प्रमुखाच्या नियुक्तीमध्ये प्रमुखाची भूमिका पार पाडावी तसेच विद्यापीठाला मिळणाऱ्या अनुदानाबद्दल आयोगधोरण निश्चित करेल.

3) **शिक्षणावरील खर्च** :- सध्या राज्य सरकार शिक्षणावर राष्ट्रीय उत्पन्नाच्या 3.5 टक्के इतका खर्च करते. हा खर्च अतिशय कमी आहे. यामूळे शैक्षणिक संस्थांना मूलभूत सुविधा पुरवता येत नाही. त्यामूळे शिक्षणाचा दर्जा टिकवून ठेवणे कठीण जाते. शासनाने हा खर्च 6 टक्के एवढा करावा, जेणे करून शिक्षणासाठी योग्य वातावरण निर्माण करता येईल व मूलभूत सुविधा बरोबर शैक्षणिक सुविधा पुरविता येतील.

4) **स्वायत्तता** :- विद्यापीठ स्वायत्त असावीत, सरकार आणि समाज यांना जबाबदार असावीत, विद्यापीठाचे मूल्याकंन बाहेरील संस्था किंवा व्यक्तीकडून केले जावे.

5) **शैक्षणिक शहरे** :- शिक्षण संस्था शहराबाहेर असाव्यात. सर्व संस्था एकाच ठिकाणी उभारल्या जाव्यात जेणेकरून सर्वांना एकमेकाच्या अस्तित्वाचा, मूलभूत सुविधांचा आणि उपलब्ध असलेल्या साधनांचा पर्याप्त वापर करता येईल. त्याच बरोबर शैक्षणिक वातावरण निर्माण होईल, आणि शहरावरील भार हलका होईल.

6) **प्रशासकीय कामाबाबत** :- विद्यापीठाकडे फक्त अध्यापनाचे कार्य असावे विद्यापीठाचा जवळ-जवळ सगळाच वेळ या प्रशासकीय कामातच जातो. विद्यापीठात नियुक्त झालेले शिक्षणतज्ज्ञ कुलगुरू पासून सर्व पदाधिकारी आपली कार्यक्षमता प्रशासकीय कामातच खर्च करतात. त्यामूळे समितीने अशी शिफारस केली आहे की, प्रशासकीय कामासाठीची स्वतंत्र व्यवस्था विकसीत करावी. विद्यापीठाला या कामातून मुक्त करून त्यांचेकडून अध्यापनाचे कार्यच करून घेतले जावे.

7) **निवडणुक** :- आयोगाने निवडणुका घेऊ नये म्हणून शिफारस केली आहे. निवडणुकीमुळे महाविद्यालयातील व विद्यापीठातील वातावरण दूषित होते. राजकीय रंग येतो, आणि शैक्षणिकता हरवते.

8) **निधी** :- विद्यापीठाला निश्चित निधी मिळाला पाहिजे. खर्च करण्याची स्वायत्तता हवी. त्याचबरोबर विद्यापीठाने स्वतःचे आर्थिक स्त्रोत निर्माण करून स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करावा.

9) **कुलगुरू** :- विद्यापीठाचा एकमेव शैक्षणिक आणि प्रशासकीय प्रमुख असावा. वैधानिक सल्लागार समितीच्या साहय्याने कुलगुरूनी निर्णय घ्यावेत. या समितीत ज्या तज्ज्ञाचा समावेश असेल ते विद्यापीठाशी संबंधीत नसतील जागतिक स्तरावर होणाऱ्या बदलांचा विचार करून ही समिती कुलगुरूला सल्ला देण्याचे काम करेल.

10) **सिनेट** :- सिनेट विसर्जित करावी. त्या ऐवजी सोसायटी पार्टनरशिप कौन्सिलची स्थापना करावी या नियुक्ती कुलगुरूच्या सल्याने राज्यपालानी करावी या न कौन्सिलने समाज आणि विद्यापीठ यांच्यातील संबंध अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करावा.

11) **विद्यार्थी** :- विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार विषय निवडण्याचे स्वातंत्र्य असावे. त्यासाठी क्रेडीट सिस्टीम प्रत्येक विद्यापीठाने सुरू करावी. क्रेडीट हस्तातरीत करून दुसऱ्या संस्थामधून विषय शिकण्याची परवानगी असावी. अध्यापन विद्यार्थी केंद्रीत असावे. त्यामध्ये लवचिकता, समाजभिमुखता, व्यावसायिकता आणि मूल्याधिष्टता असावी.

12) **अभ्यासक्रम** :- मूलभूत विषयावर आधारित अभ्यासक्रम तयार करावेत. यामध्ये आंतरविद्याशाखीय व व्होकेशनल यांचा विचार व्हावा.

13) **उद्योग आणि संशोधन** :- अभ्यासक्रमात व्यवसायभिमूखता येण्यासाठी व रोजगारक्षमता वाढवण्यासाठी उद्योग आणि विद्यापीठ यांच्यात सुसंवाद निर्माण होणे व तो वाढणे गरजेचे आहे. या सुसंवादातून उद्योगास अनुकूल असणाऱ्या अभ्यासक्रमाची निर्मिती करण्यात यावी. यातूनच राष्ट्रीय प्रयोगशाळा व उद्योग यांच्याशी विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष संबंध येऊन शिक्षणात प्रयोगिकता निर्माण व्हावी.

दैनिक लोकसत्ता आणि सारस्वत बँक तर्फे मुंबई येथे दोन दिवसाचे चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. 2 व 3 ऑगस्ट या दोन दिवसात शिक्षणात महाराष्ट्र कोठे ? या विषयावर चर्चा करण्यात आली. त्या चर्चासत्रात शिक्षणासंबंधी खालील मुद्यांची मांडणी करण्यात आली. यामध्ये ज्येष्ठ शिक्षणातज्ज्ञ डॉ. शां.ब. मुजुमदार यांनी जशिक्षणविषयक विचार मांडले.

ज्ञानधारित अर्थकारणाची सुरूवात झाली आहे. या व्यवस्थेत टिकायचे असेल तर शैक्षणिक क्रान्तीची आवश्यकता आहे. यासाठी छोटी विद्यापीठे उभारावी लागतील. शहराऐवजी ग्रामीण भागात विद्यापीठांची उभारणी व्हावी. शिक्षण, संशोधन, कौशल्य आणि तंत्रज्ञान यांना वेगवेगळ्या कप्प्यात बंद करणारी वर्णाश्रम व्यवस्था दूर करून शिक्षणांचा सर्वांगीण विचार करणे आवश्यक आहे.

शिक्षण क्षेत्रासामोरील आव्हाने : -

- विस्तार करणे
- गुणवत्ता वाढ सर्वसमावेशकता राखणे
- उच्च शिक्षणातील गळती
- परमिटराज

पर्याय - छोटी विद्यापीठे

- नावीन्यपुर्ण शिक्षण पद्धती
- कौशल्ये विकसीत करणारी शिक्षण व्यवस्था - डॉ. अनिल काकोडकर :
-विद्यापीठाची संकुले ग्रामीण भागात उभारावी..
- त्यातून ग्रामीण समस्यावर मात करणारे संशोधन व्हावे.
- नवीन तंत्रज्ञानाची निर्मिती
- परिसरातील लोकांना रोजगार
- संशोधन तंत्रज्ञान आणि त्यांचा औद्योगिक उपयोग

यांचा सहसंबंध प्रस्थापित होणे आवश्यक

(पुनरस्थान समरसता गुरुकुलमचे संस्थापक गिरीश प्रभुणे) यांच्या मते :

-शाळेचे शिक्षण आणि मुलांचा जीवनक्रम यांच्यात साम्य नाही.
- दैनंदिन जगण्यापासून शिक्षण विद्यार्थ्यांना दूर नेते.
- या विद्यार्थ्यांतील असलेल्या क्षमतेनुरूप त्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक.
- शिकवण्यापेक्षा मुलांचा सहभाग आवश्यक

रेणूताई दांडकर :

- जगताना शिकायच आणि शिकत जगायचे.
- शालेय यंत्रणा ऐवजी शालेय रचना हा शब्द योग्य
- शाळेच्या शिक्षणाची रचना मुलांकडून करणे आवश्यक रचनेतून जाणीवाची निर्मिती

शिक्षणतज्ञ रमेश पानसे :

- शिक्षण समस्यातील तीन टप्पे आहेत.
- सर्व मुले शाळेत येणे
- शाळेतील गळती रोखणे
- मुले शिकती करणे

पहिलाच टप्पा पूर्ण करण्यात अडचण येत असल्यामुळे त्यांना शिकती करणे कठीण जाते.

प्राज इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक प्रमोद चौधरी : -

- उच्च शिक्षण ही सापेक्ष संकल्पना
- त्रिभागणी - रोजगारभिमुख (Vocational) व्यावसायिक Professional आणि उच्च (Advance)
- मल्टिडिसिप्लिनरी अप्रोच विकसीत होणे आवश्यक
- उच्च शिक्षितांना प्रशिक्षण देणे आवश्यक
- मानव्य शाखा व्यक्तिमत्व विकासासाठी

डॉ. अविनाश तुपे (अधिष्ठता लोकमान्य टिळक रूग्णालय) :

- शिक्षणास सेवाभाव आवश्यक
- नवपरिवर्तनीय संकल्पनाचा स्वीकार.

डॉ. गणपत यादव (युआयसीटीचे संचालक) :

- उच्च शिक्षितांचे प्रमाण 30 टक्क्यापर्यंत नेण्यासाठी 1500 विद्यापीठाची गरज
- विद्यापीठाचे उद्दिष्ट्ये नवीन ज्ञान निर्माण करणे असावे.

डॉ. हेमचंद्र प्रधान (होमी भाभा विज्ञान केंद्र संचालक) : -

- ज्ञान रचले जावे
- प्रत्येक विषयाला एक संस्कृती असते.
- संस्कृती रूजवणे व ती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवणे हे शिक्षकाचे कार्य असते.

अवनिता बीर (मुख्याध्यापिका आर.एल.पोद्दार) : -

- विद्यार्थ्यांवरील अभ्यासाचा ताण कमी करणे
- शिक्षणाचा संबंध त्यांच्या आयुष्यासाठी जोडणे
- सातत्यपूर्ण आणि सर्वांगीण मूल्यमापन

मिलींद चिंदरकर (सचिव महात्मा गांधी विद्यामंदीर) : -

- अनुभवाधारित शिक्षण विद्यार्थ्यांला ज्ञानाचा उपयोग करायला शिकवते
- अनुभवातून व्यक्तीमत्वातील शक्ती स्थानाची ओळख होते.
- शिक्षणासाठी शिक्षकांनी कल्पकतेचा अवलंब करावा.

दत्तात्रय सकट (कर्डलवाडी शाळा संस्थापक) : -

- विद्यार्थीभिमूख अभ्यासक्रम
- मुलांना कळणारा व झेपणारा अभ्यासक्रम
- प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून
- शाळेना स्वतंत्र विचार करण्याचे स्वातंर्त्य
- भाषा रूजवण्यासाठी वाचन आणि आकलन यांचा कल्पकतेने वापर

शिक्षणतज्ज्ञांच्या विचाराचा व काकोडकर समितीच्या अहवालाचा अभ्यास केल्यानंतर काही त्रुटी दिसून येतात.

अहवालातील त्रुटी : -

1) अनिल काकोडकर यांनी सरकारला सादर केलेल्या अहवालामध्ये अनेक प्रश्नांचा अभ्यास केला. शिक्षणासमोरील आव्हाने आजच्या काळातील गरज व त्यावरील उपाय सुचवून शिक्षणात फार मोठे बदल अपेक्षीत धरले आहेत.

हे सर्व करीत असताना आयोगाने शिक्षणाचा कणा म्हणून ओळखला जाणाऱ्या प्राध्यापकांविषयी सूचना केल्या नाहीत. आजमितीस प्राध्यापकांचा दर्जा हा फार - मोठा संशोधनाचा विषय आहे. त्यांनी मिळविलेल्या प्रथम वर्ग, पीएच.डी. किंवा सेट उत्तीर्णचे प्रमाणपत्र यावर संगोपाग चर्चा होणे अहवालात गरजेचे होते. त्याचबरोबर प्राध्यापक निवडीसाठीची आजची अस्तित्वात असलेली व्यवस्था बघितल्यानंतर या

जागतिकीकरणाच्या स्पर्धेत भारत टिकू शकेल का ? हा प्रश्न निर्माण होतो. 15 ते 20 लाख रूपये डोनेशन दिल्याशिवाय त्या प्राध्यापकांची नियुक्ती दिली जात नाही. अशा नियुक्तीतून प्राध्यापकांचा दर्जा आणि उत्तरदायित्व कसे तपासणार हाच खरा प्रश्न आहे. या समितीने प्राध्यापकांची निवड त्यांचा दर्जा यावर भर दिला नाही.

2) पुरेसे मनुष्यबळ :

क्रेडीट सिस्टीम राबवून विद्यार्थ्यांला स्वतःचा कोर्स तयार करण्याची संधी दिली आहे. परंतू या प्रकारची ज्व्यवस्था राबवण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ अपेक्षीत आहे. परंतू सरकारी महाविद्यालयातून अद्यापही पुरेसा प्राध्यापक वर्ग नसतो. तसेच महाराष्ट्रात प्राध्यापकांच्या शैक्षणिक निकषा बद्दलचा वाद 1991 पासून सुरू आहे तो 2013 पर्यंत अजून संपला नाही. वीस वर्षाच्या सेवेतील प्राध्यापक अद्यापही ॲडव्हॉक आहेत. याबद्दल समितीने कोणतीच शिफारस केली नाही.

अहवालात काही त्रुटी असल्यातरी शिक्षणात क्रांतीकारक बदल घडवून आणण्याची क्षमता त्यामध्ये असलेली दिसून येते.

या नवीन शिफारसीमधून विद्यापीठाचे व महाविद्यालयाचे उत्तरदायित्व वाढते. त्याच बरोबर अध्यापनभिमूख व्यवस्था विकसीत होऊ शकते.

सिनेटसारख्या निवडणुका रद्द केल्यामुळे जे प्राध्यापक पाच वर्ष राजकारण करीत होती त्यांना आता महाविद्यालयात थांबणे आवश्यक राहील. कुलगुरूला या अहवालात केलेल्या शिफारसीमुळे जास्तीचे अधिकार मिळणार आहेत. त्यामूळे कुलगुरूला निर्णय घेणे, आमलात आणणे अधिक सोपे जाईल. त्यामूळे कामात गतीशीलता निर्माण होईल.

जागतिकीकरणाच्या बदलावर शिक्षणाची दुरावस्था बघितल्यानंतर भारताला या स्पर्धेत टिकण्यासाठी शिक्षणात आमुलाग्र बद्दल घडवून आणणे गरजेचे आहे. हे बद्दल उद्योगामध्ये आणि निर्माण होणाऱ्या नवीन स्पर्धेशी अनुकूल असावेत तरच भारत या खुल्या स्पर्धाचा फायदा घेऊन महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहू शकतो.

121 कोटी लोकसंख्या असलेल्या देशात मानवी भांडवलाची उपलब्धता आज सर्वात जास्त आहे. तरूण शिक्षणात आमुलाग्र बद्दल घडवून आणणे ही काळाची गरज आहे.

अनिल काकोडकर यांच्या समितीने केलेल्या शिफारशीचा स्वीकार राजकारणाचा स्पर्श न होता केला तर निश्चितच या मानवी भांडवलाचा अर्थव्यवस्थेसाठी महत्तम वापर करता येईल. व भारत उद्याची आर्थिक महासत्ता असेल. या उलट झाले तर 'अराजकता' ही या व्यवस्थेचा भाग बनेल व भारत माल्थसच्या सिद्धांताला पूर्णरूप देण्याचे काम करेल.

संदर्भ ग्रंथ :

1) महात्मा फुले - गुलामगिरी
2) मानवी संसाधन मंत्रालयाची पाहणी अहवाल 2011
3) प्रथमेशचा अन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट 2012
4) केंद्रीय मनुष्यबळ विभाग 2011
5) युजीसी अन्युअल रिपोर्ट (एप्रिल 3, 2007)
6) अनिल काकोडकर समितीची अहवाल (स्त्रोत दैनिक लोकसत्ता)
7) फ्रेडमन द वर्ल्ड इन फ्लॅट.
8) दैनिक लोकसत्ता दि.03 ऑगस्ट 2013, दि.05 ऑगस्ट 2013, 06 ऑगस्ट 2013, 07 ऑगस्ट 2013, 15 ऑगस्ट 2013